**समांतर आरक्षण- मागासवर्गीय उमेदवारांचा खुल्या प्रर्वगातील पदांसाठी विचार- वस्तुस्थिती**

गेल्या काही दिवसांमध्ये, काही वृत्तपत्रात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या समांतर आरक्षण राबविण्याच्या कार्यपध्दतीबाबत बातम्या येत आहेत. त्यातील काही बातम्या वस्तुस्थितीशी विसंगत व आयोगाबाबत गैरसमज निर्माण होणा-या आहेत. यामधून आयोगाने मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील पदासाठी परीक्षेस बसु देण्यास किंवा मुलाखत घेण्यास अटकाव केला, असे विपर्यस्त चित्र तयार होवून आयोगाबद्दल गैरसमज पसरण्याची शक्यता आहे. यास्तव **यासंबंधातील वस्तुस्थिती खालील प्रमाणे उमेदवारांच्या माहितीसाठी स्पष्ट करण्यात येत आहे.**

आरक्षणाबाबत राज्य शासनाने ठरविलेले धोरण राबविण्याचे काम लोकसेवा आयोग करतो. समांतर आरक्षण (Horizontal Reservation) राबविण्याच्या पध्दती विषयी शासनाने दिनांक 13 ऑगस्ट्, 2014 रोजी स्पष्टीकरण करणारे परीपत्रक काढले आहे. त्यानुसार आयोग कार्यवाही करीत आहे. सदर परीपत्रकानुसार “खुला-महिला” (Open-Female) किंवा “खुला-खेळाडू” (Open-Sports) या समांतर आरक्षणाच्या (Horizontal Reservation) पदांवर, खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची शिफारस करणे आवश्यक आहे. खुला-सर्वसाधारण (Open-General) प्रवर्गातील पदांवर मात्र अमागासवर्गीयां बरोबरच मागासवर्गीय उमेदवारांचीही गुणवत्तेनुसार शिफारस केली जाते. “खुला-सर्वसाधारण” प्रवर्गातील पदांवर सर्व प्रवर्गातील उमेदवारांचा केवळ त्यांच्या गुणवत्तेआधारे विचार केला जातो. हे करतांना गुणवत्तेआधारे “खुला-सर्वसाधारण” पदावर पात्र ठरणा-या मागासवर्गीय उमेदवाराची शिफारस खुल्या प्रवर्गातील पदांवर केली जाते व अश्या उमेदवारांपेक्षा कमी गुण असलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची, त्यांच्या प्रवर्गातील राखीव पदांसाठी शिफारस केली जाते. गुणवत्तेआधारे अनेक मागासवर्गीय उमेदवारांचा खुल्या सर्वसाधारण (Open-General) पदांवर शिफारशी केल्या जातात हे आयोगाकडून वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या निकांलावरुन स्पष्ट होईल. उदा. अलिकडेच जाहिर केलेल्या विक्रिकर निरीक्षक परीक्षा-2016 च्या निकालामध्ये शिफारस केलेल्या अराखीव खुल्या प्रवर्गातील 66 उमेदवारांमध्ये 28 उमेदवार हे गुणवत्तेच्या आधारे शिफारस झालेले राखीव प्रवर्गातील उमेदवार आहेत. पैकी भ.ज-क प्रवर्गातील 7 व इ.मा.व. प्रवर्गातील 15 उमेदवार खुल्या अराखीव पदावर शिफारस झालेले आहेत. **केवळ “खुला-महिला” व “खुला-खेळाडू”** अश्या **समांतर आरक्षणाच्या (Horizontal Reservation) पदांवर शिफारस करतांना,** शासन परीपत्रक दिनांक 13 ऑगस्ट, 2014 मधील सुचनांनुसार, फक्त **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची शिफारस केली जाते.**

समांतर आरक्षणाच्या पदांवर शिफारस करावयाचे उमेदवार त्या-त्या प्रवर्गातील आहेत हे खात्री करण्यासाठी, शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत मागविण्याची / पाहण्याची पध्दत अलीकडे आयोगाने सुरु केली आहे. त्याआधारे व इतर प्रकारे, समांतर आरक्षणाच्या पदांसाठी शिफारशी करावयाच्या उमेदवारांच्या प्रवर्गाची खात्री केली जाते. **खुल्या -सर्वसाधारण प्रवर्गातील पदांवर पुर्वीप्रमाणेच गुणवत्तेआधारे मागासवर्गीय उमेदवारांचाही विचार व शिफारशी केल्या जातात.**

**सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**